थोडक्यात

एम.जी.रोडवर कर्मचाऱ्याच्या खिशातून मोबाईलसह रोकडची चोरी

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । दुकानाच्या बाहेर ओट्यावर झोपलेल्या कर्मचाऱ्याच्या खिशातून एक मोबाईल व सहा हजार रुपयांची रोकड असा ११ हजार रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना एम. जी. रोड येथे घडली. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, की फिर्यादी छोटू वामन शिरोडे (रा. ओम्कारनगर, पेठ रोड, नाशिक) हे एम. जी. रोडवरील डेअरी डॉन शॉप येथे कामाच्या ठिकाणी शॉपच्या बाहेर ओट्यावर झोपले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने शिरोडे यांच्या पँटच्या खिशात असलेली सहा हजार रुपयांची रोकड व पाच हजार रुपये किमतीचा मोबाईल असा ११ हजार रुपये किमतीचा ऐवज लबाडीच्या इराद्याने चोरून नेला. या प्रकरणी सरकारवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस नाईक शेवडे करीत आहेत.

पखालरोडला पावणेदोन लाखांची घरफोडी

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । टेरेसचा दरवाजा उघडून अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सोन्याचांदीच्या दागिन्यांसह रोकड असा सुमारे पावणेदोन लाखांचा ऐवज घरफोडी करून चोरून नेल्याचा प्रकार वडाळा गाव येथे घडला. याबाबत नरेंद्र प्रकाश वनवे (रा. वडाळा गाव, नाशिक) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले, की त्यांची बहीण अनिता पिंगळे व त्यांचे पती देवीदास रामचंद्र पिंगळे (दोघेही रा. विधातेनगर, पखाल रोड) हे दाम्पत्य जगन्नाथपुरी येथे देवदर्शनासाठी दि. ३ जून रोजी गेलेले आहेत. त्यादरम्यान त्यांचे जावई आशुतोष लेंडे हे पुणे येथून लॉच्या परीक्षेसाठी नाशिक येथे पिंगळे यांच्या घरी आले असता त्यांनी घराचा दरवाजा उघडून घरात प्रवेश केला. त्यावेळी घरातील कपाट उघडे दिसले, तसेच घराचा मागील दरवाजाही उघडा दिसून आला. त्याचप्रमाणे घराच्या टेरेसवरील लोखंडी दरवाजाही उघडा असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी घरातील कपाट पाहिले असता ते उघडे होते. त्यातील ४५ हजार रुपये किमतीचा तीन तोळ्यांचा सोन्याचा राणीहार, ७५ हजार रुपये किमतीच्या अडीच तोळ्यांच्या सोन्याच्या दोन पोती, २२ हजार रुपये किमतीचे दीड तोळ्याचे सोन्याचे मणी, २२ हजार रुपये किमतीचे तीन ग्रॅम वजनाचे पायातील जोड, ४ हजार ५०० रुपये किमतीचे कानातील सोन्याचे वेल असा सुमारे पावणेदोन लाखांचा ऐवज अज्ञात चोरट्याने घरफोडी करून चोरून नेला. या प्रकरणी मुंबई नाका पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

गोमांसाची वाहतूक करणाऱ्या पाचपैकी एक ताब्यात, सात लाखांचा मुद्देमाल हस्तगत

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । गोमांसाची विक्री करण्यासाठी अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या टेम्पोचालकास अडवून त्याच्याकडून गोमांस व टेम्पोसह सुमारे सात लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून, पाचपैकी एकाला अटक करण्यात आली आहे. याबाबत गुन्हे शाखा युनिट-२ चे अंमलदार तेजस मते यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले, की आरोपी अजहर सफदर खान (वय ३१, रा. राजवाडा, वडाळा गाव, नाशिक), शोएब समन कुरेशी (रा. वडाळा गाव, नाशिक), नाजीर, बबलू कुरेशी, अजिज कादिर कुरेशी (सर्वांची पूर्ण नावे व पत्ते माहीत नाहीत) हे पाच जण गोवंश जनावरांची हत्याबंदी कायदा लागू असतानाही या कायद्याचे उल्लंघन करून १ लाख ४५ हजार रुपये किमतीचे ७२५ किलोग्रॅम गोमांस विक्री करण्याच्या उद्देशाने एमएच ४१ एयू ४०४९ या क्रमांकाच्या टेम्पोमध्ये टाकून वाहतूक करताना मिळून आले. हा प्रकार वडाळा गावातील नाशिक स्टीलजवळ उघडकीस आला. या प्रकरणी इंदिरानगर पोलीस ठाण्यात पाच आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, सात लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यातील एकाला अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार खरोटे करीत आहेत.

नमामी गोदा प्रकल्पाला सल्लागार संस्थेकडूनच अडसर

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । नाशिक शहरातून वाहणारी गोदावरी नदी पुनर्जीवित करण्यासाठी 'नमामि गंगा' प्रकल्पाच्या धर्तीवर 'नमामि गोदा' हा महत्वकांक्षी प्रकल्प राबविला जाणार आहे. मात्र अद्यापही या प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार होत नाही. सल्लागार संस्थेकडून महापालिकेने सुचविलेल्या सूचनांचा समावेश आराखड्यात केला जात नसल्याने ताकीद देण्यात आली आहे. नाशिक शहरातून गोदावरी नदीचा प्रवास १९ किलोमीटरचा आहे. गोदावरी नदी घाटावर दर बारा वर्षांनी कुंभमेळा भरत असल्याने जगभरात धार्मिक महत्त्व आहेतच. दरवर्षी गोदावरीत स्नानासाठी लाखो भाविक येतात. परंतु गेल्या काही वर्षात कंपन्या व घरातून बाहेर पडणारे सांडपाण्याचे नाले नदीत मिसळत असल्याने प्रदूषण वाढले आहे. दरवर्षी गोदावरी स्वच्छतेसाठी करोडो रुपये खर्च केले जातात. परंतु उपयोग होत नाही. केंद्र सरकारने बनारसमध्ये गंगा नदी स्वच्छ करण्यासाठी नमामि गंगा प्रकल्प राबविला. त्याच धर्तीवर नाशिकच्या गोदावरी नदी सौंदर्यीकरण व प्रदूषणमुक्त करण्यासाठी नमामि गोदा प्रकल्प राबविला जाणार आहे. २०२० मध्ये केंद्रीय जलशक्ती मंत्रालयाने या संदर्भात सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला दिल्या होत्या. महापालिकेने सल्लागार संस्थेची नियुक्तीदेखील केली, परंतु अद्यापपर्यंत संस्थेने सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केला नाही. वर्षाच्या प्रारंभी यासंदर्भात बैठक झाली.

या वेळी मनपाच्या विविध विभागाकडून महत्त्वाचे बदल सुचविण्यात आले. जसे की, गोदावरी सौंदर्यीकरण, मलजल व्यवस्था, स्वच्छता या बाबींचा समावेश होता. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना यात सूचनांचा समावेश करावा, असे निर्देश देण्यात आले होते.

लोकसभा निवडणुकीचे आचारसंहिता शिथिल झाल्यानंतर बुधवारी (ता. ५) महापालिका मुख्यालयात सल्लागार संस्थेच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलाविण्यात आली मात्र संस्थेकडून प्रकल्प अहवाल सादर केला गेला नाही. त्यामुळे ताकीद देतानाच पुढील आठवड्यामध्ये पुन्हा कामाचे सादरीकरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या, अशी माहिती शहर अभियंता संजय अग्रवाल यांनी दिली. काय आहे प्रकल्पात? गोदावरी प्रदूषणमुक्त. नदीत मिसळणारे गटारींचे पाणी थांबविणार. नव्या गटारी टाकण्याबरोबरच जुन्या गटारींची दुरुस्ती. मलनिस्सारण केंद्रांचे आधुनिकीकरण व क्षमतावाढ कारखान्यांच्या सांडपाण्याचा पुनर्वापर गोदाघाट विकास व सौंदर्यीकरण.

चोरट्यांनी केला कहर; फ्रिजमध्ये लपविलेले दागिने केले लंपास

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । जगन्नाथपुरी येथे देवदर्शनासाठी गेलेल्या कुटुंबाच्या बंगल्यात शिरुन चोरट्यांनी सोन्याचा राणीहार, पोत, मणी, जोडवे आणि वेल असे दागिने लंपास केल्याची घटना पखालरोड परिसरात घडली. विशेष म्हणजे, 'फ्रिज' मध्ये दागिने लपविले असतानाही चोरट्यांनी ते शोधून काढत चोरुन नेले. याप्रकरणी १ लाख ६८ हजारांचा मुद्देमाल चोरल्याप्रकरणी अज्ञातांविरुद्ध मुंबई नाका पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा नोंदवला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, वडाळागावातील (थरवरश्ररसरेप) रहिवाशी नरेंद्र वनवे (वय ५४) यांनी मुंबई नाका पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यांची बहिणी अनिता देविदास पिंगळे यांच्या राहत्या बंगल्यात ही घरफोडी झाली. अनिता व देविदास हे दोघे ३ जून रोजी रात्री साडेबारा वाजता जगन्नाथ पुरी येथे देवदर्शनासाठी रवाना झाले. त्यानंतर ५ जून रोजी मध्यरात्री एक वाजता त्यांचे जावई आशुतोष लेंडे हे पुणे येथून नाशिकमध्ये विधी परीक्षेसाठी पोहोचले. त्यांनी सासऱ्यांच्या घराचा मुख्य दरवाजा स्वता:कडील किल्लीने उघडला. दरम्यान, त्यावेळी घरात चोरी झालाचा संशय आल्याने त्यांनी वनवे यांना कळविले. वनवे यांनी बंगल्याची पाहणी केल्यावर पोलिसांत धाव घेतली. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक निसार शेख पुढील तपास करीत आहेत. दरम्यान, गत महिन्यांत इंदिरानगर पोलिसांच्या हद्दीत एका घरफोडीत वॉशिंग मशिनमध्ये लपविलेले दागिने चोरट्यांनी लंपास केले होते. ३ जून रोजी पिंगळे दाम्पत्य जगन्नाथ पुरीला निघाले. त्यांचे जावई ५ जून रोजी मध्यरात्री १ वाजता बंगल्यात पोहोचले. त्यांनी मुख्य दरवाजा किल्लीने उघडला. तेव्हा घरातील सर्व सामान अस्ताव्यस्थ होते. कपाट आणि मागील दरवाजा उघडा होता. टेरेसवरील लोखंडी दरवाजाही उघडा होता. यासह तेथील भिंतीचा भाग तुटलेला दिसल्याने त्यांनी माम सासरे वनवे यांना कळविले. त्यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन बहिण अनिता हिला फोन केला. त्यांनी 'फ्रिजरमध्ये दागिने ठेवलेत, ते आहे का बघ', असे सांगितले. वनवे यांनी फ्रिजर बघितल्यावर तिथेही दागिने नव्हते. आनंदवली येथील रिजेन्सी टॉवरमधील संजय अनंत मराठे यांच्या घराचा बंद दरवाजा तोडून चोरट्यांनी सोन्याचांदीचे दागिने लंपास केले. ९४ हजार पाचशे रुपयांचा मुद्देमाल चोरल्याप्रकरणी मराठे यांनी गंगापूर पोलिसांत फिर्याद दिली आहे. मराठे यांचे शेजारी महेश रामचंद्र लादे यांच्या घरातून सहा हजार रुपये रोख व चार पेनड्राइव्हसह आधारकार्ड, स्कूलबॅग चोरट्यांनी पळविली. गंगापूर पोलिसांनी एकत्रित घरफोडी नोंदवून तपास सुरु केला आहे.

नाशिकसह जिल्ह्यातील विविध भागांत पावसाची हजेरी

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । मान्सून उंबरठ्यावर आलेला असताना पूर्वमोसमी पावसाने गुरुवार (दि.६) रोजी जिल्ह्यातील विविध भागांत हजेरी लावली आहे. आज सकाळपासून जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर उकाडा जाणवत होता. त्यामुळे नागरिक अक्षरशा घामाघूम झाल्याचे पाहायला मिळत होते. त्यानंतर सायंकाळी पाच ते सहा वाजेच्या सुमारास पावसाने नाशिकरोडसह शहरातील विविध भागांत हजेरी लावल्याने नागरिकांची चांगलीच धावपळ उडाली. नाशिकसह जिल्ह्यातील विविध भागांत आज दुपारपर्यंत कडक ऊन होते. त्यानंतर ऊन कमी होऊन सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास ढगाळ वातावरण तयार झाले. यानंतर शहरातील नाशिकरोडसह आदी परिसरात ढगांच्या गडगडाटासह पावसाने हजेरी लावली. तसेच सिन्नर तालुक्यात देखील पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे गाडी चालवतांना चालकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचे दिसून आले. तर सिन्नर एमआयडीसी परिसरात ट्रक आणि बसचा अपघात झाल्याची घटना घडली आहे.

दोघा सराईत गुंडांना गावठी कट्ट्यासह अटक; शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकची कामगिरी

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । कथडा परिसरातून एका सराईत गुंडाला तर, चौक मंडईतून तडीपार गुंड या दोघांना शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकच्या पथकाने गावठी कट्टा व तीन जिवंत काडतुसांसह अटक केली आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगारांचा शोध घेत असताना शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकचे अंमलदार विशाल देवरे यांना सराईत गुंड गावठी कट्टा बाळगून फिरत असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार, पथकाने कथडा रोडवरील भोई गल्लीत सापळा रचून संशयित मुज्जफर उर्फ मज्जू मैनौद्दिन शेख (४२, रा. भोई गल्ली, कथडा, भद्रकाली) यास अटक केली. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडून ३० हजारांचा बनावट कट्टा व एक जिवंत काडतुस हस्तगत करण्यात आला. तसेच, युनिट एकच्या पथकाला चौक मंडई परिसरात तडीपार गुंड आल्याची खबर मिळाली असता, पथकाने संशयित तडीपार गुंड आवेश उर्फ अव्वा निसार शेख (२३, रा. चौक मंडई, भद्रकाली) यास सापळा रचून अटक केली. त्याच्याकडून ३० हजारांचा गावठी कट्टा व दोन जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. या दोघांविरोधात भद्रकाली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपासाकामी भद्रकाली पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदरची कामगिरी युनिट एकचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक हेमंत तोडकर, रवींद्र बागुल, प्रवीण वाघमारे, प्रदीप म्हसदे, विशाल काठे, संदीप भांड, शरद सोनवणे, विशाल देवरे, नाझीम खान, जगेश्वर बोरसे, अमोल कोष्टी यांनी बजावली.

आरटीई'साठी आज सोडत; जिल्ह्यात १४ हजार ८४२ विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल

लोकमंथन । प्रतिनिधी

नाशिक । शिक्षणाचा हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) खासगी शाळांमध्ये राखीव २५ टक्के जागांवर मोफत प्रवेशाच्या प्रक्रियेत सोडतीची प्रतीक्षा संपली आहे. शुक्रवारी (ता. ७) सकाळी अकराला पुणे येथून ऑनलाइन पद्धतीने सोडत काढली जाणार आहे. यानंतर विद्यार्थी प्रवेशाचा मार्ग मोकळा होईल.

दरम्यान, नाशिक जिल्ह्यातून या योजनेंतर्गत प्रवेशासाठी १४ हजार ८४२ अर्ज दाखल झाले आहेत .आर्थिक, सामाजिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गातील विद्यार्थ्यांना मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने राज्यस्तरावर ही योजना कार्यान्वित आहे. याअंतर्गत खासगी शाळांमध्ये २५ टक्के जागांवर लाभार्थी विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश दिला जात असतो.

उपलब्ध जागांच्या तुलनेत दाखल अर्जांची संख्या अधिक राहात असल्याने सोडत पद्धतीने लाभार्थी विद्यार्थ्यांची निवड केली जाते. दरम्यान, योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत यापूर्वी ३१ मेपर्यंत होती.

या मुदतीत आता वाढ करताना मंगळवार (ता. ४) पर्यंत विद्यार्थ्यांचे अर्ज दाखल करण्याची संधी दिली होती. ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता पुढील प्रवेशप्रक्रिया सुरू होत आहे. त्यानुसार शुक्रवारी (ता. ७) सकाळी अकराला पुण्याहून सोडत काढली जाईल. यानंतर विद्यार्थ्यांना कागदपत्र पडताळणी करून व इतर प्रक्रिया पूर्ण करताना प्रवेश निश्चित करण्याची संधी मिळणार आहे. नाशिक जिल्ह्याचे चित्र योजनेत सहभागी शाळा- ४२८ प्रवेशासाठी उपलब्ध जागा- पाच हजार २७१ प्रवेशासाठी दाखल अर्जसंख्या- १४ हजार ८४२ राज्याचे चित्र योजनेत सहभागी शाळांची संख्या- नऊ हजार २१७ प्रवेशासाठी उपलब्ध जागा- एक लाख पाच हजार ३९९ प्रवेशासाठी दाखल अर्जसंख्या- दोन लाख ४२ हजार ९९७

यशवंत मंडईतील गाळे खाली करण्याची तयारी

नाशिक । रविवार कारंजावरील अत्यंत धोकेदायक अवस्थेतील महानगरपालिकेच्या मालकीची यशवंत मंडई तत्काळ खाली करा, अशी अंतिम नोटीस महापालिकेच्या कर संकलन विभागाने पाठविल्यानंतर तेथील व्यावसायिक मनपा आयुक्तांची भेट घेणार असून, या ठिकाणी नवीन इमारत बांधल्यावर आम्हाला तेथे जागा द्यावी, अशी त्यांची मागणी आहे. आयुक्तांनी ठोस आश्वासन दिल्यानंतर गाळे खाली करण्याची तयारी व्यावसायिकांनी दर्शवली आहे. मनपाच्या यशवंत मंडईची इमारत जीर्ण व अत्यंत धोकेदायक झाली आहे. मागील दोन-तीन वर्षांत अनेक व्यावसायिकांनी येथून स्थलांतर केले. परंतु तळ मजल्यावरील गाळेधारक ताबा सोडण्याचा नकार देत होते. दोन महिन्यांपूर्वी महापालिकेने त्रयस्थ संस्थेकडून यशवंत मंडईचे ऑडिट केले. त्यात ही इमारत धोकेदायक असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर महापालिका कर संकलन विभागाने येथील २४ व्यावसायिकांना तातडीने गाळी खाली करा, अशा सूचना दिल्या. मात्र, त्या विरोधात व्यावसायिक उच्च न्यायालयात गेले. न्यायालयाने मनपा व व्यावसायिक दोघांनाही ऑडिट अहवाल सादर करण्यास सांगितले. या दोन्ही अहवालांत ही इमारत धोकादायक असल्याचा निर्वाळा दिला. त्यानंतर मनपा प्रशासनाने न्यायालयाच्या निर्णयाचा आधार घेत येथील व्यावसायिकांना गाळे खाली करण्यास सांगितले. मात्र, तरीदेखील सहकार्य केले जात नसल्याने पावसाळ्यात मोठी दुर्घटना होण्याची भीती पाहता नाशिक महानगरपालिका प्रशासनाने येथील व्यावसायिकांना ३१ मेपर्यंत गाळे खाली करण्याचा अल्टिमेटम दिला होता.

एल&टी फायनान्स लिमिटेड
(आधीचे नाव, एल&टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड)
नोंदणीकृत कार्यालय: एल&टी फायनान्स लिमिटेड, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीज शोरुम जवळ, सांताक्रूझ (पू), मुंबई 400 098
CIN No.: L67120MH2008PLC181833
शाखा कार्यालय: नाशिक

L&T Finance

तारण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी जाहीर लिलाव

एल&टी फायनान्स लिमिटेडचे अधिकृत अधिकारी वित्तीय मालमत्ता पुनर्रजना आणि अनामत व्याजाची सक्तवसुली कायदा, 2002 [54 चा 2002] अंतर्गत आणि सदर कायद्यांतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून आपली थकबाकी आणि पुढील व्याज, आकार आणि खर्च इ.च्या वसुलीसाठी **''सार्वजनिक ई-लिलावाद्वारे''** **''जिथे आहे जसे आहे तत्वावर''** आणि **''ज्या स्थितीत आहे त्या स्थितीत तत्वावर''** खालील मालमत्तेचा ई-लिलाव करीत आहेत.

कर्जदार आणि सह-कर्जदाराचं नाव	तारण ठेवलेल्या मालमत्तेचा पत्ता	कर्ज खाते क्रमांक (एक/अनेक)	भौतिक ताबा घेतला	बयाणा रक्कम आरपीच्या 10% किंवा जास्त (रुपयांमध्ये)	एकूण शिल्लक थकबाकी 05.06.2024 नुसार	आरक्षित किंमत (रुपयांमध्ये)	आरभाची तारीख	लिलावाची तारीख आणि वेळ
1. वीरेंद्र शिव शंकर कुमार 2. संदिप भावसाहेब दराडे	मालमत्तेच्या पत्त्याचा सर्व तुकडा आणि पार्सल - फ्लॅट क्र. 3, स्टिल्ट फ्लोअरवर 550 चौ.फूट क्षेत्रफळाचे मोजमाप, साई प्रसाद अपार्टमेंट, क्र. 332/3/2/4, प्लॉट क्र. 4, पार्क साइड रेसिडेन्सी समोर, वडाळा-पाथर्डी रोड, नाशिक. सीमा: पूर्व - मार्जिनल स्पेस; पश्चिम - पॅसेज आणि फ्लॅट क्र. 02; उत्तर - मार्जिनल स्पेस; दक्षिण - फ्लॅट क्र. 04	NSKHL18000182 & NSKHL18000276	1 मार्च 2024	रु. 1,36,611.40/-	रु. 33,31,519.12/-	रु. 13,66,114/-	सर्व कामकाजाच्या दिवशी पूर्व भेटीसह	25-06-2024 सकाळी 10:00 ते संध्याकाळी 5:30 पर्यंत.

सार्वजनिक लिलावाच्या अटी आणि नियम

1. अधिकृत अधिकाऱ्यांकडून सरफेसी कायद्या अंतर्गत https://sarfaesi.E-auctiontiger.net वेबसाइटवरून मदतीसह आणि जाहीर ई-लिलाव पध्दतीने, ऑनलाइन ई-लिलाव विक्री केली जात आहे.
2. हा जाहीर ई-लिलाव वर उल्लेखित दिनांक आणि वेळेस केला जाईल, जेव्हा वर उल्लेखित ताब्यात घेतलेली मालमत्ता **''जशी आहे जिथे आहे तत्वावर''** आणि **''जशी आहे ज्या स्थितीत आहे''** त्या तत्वावर विकली जाईल.
3. सदर जाहीर ई-लिलावत सहभागी होण्यासाठी, इच्छुक खरेदीदार/बोली लावणाऱ्यांना **24/06/2024** रोजी किंवा त्यापूर्वी पॅनकार्ड, कंपनीच्या बाबतीत मंडळाचे ठराव आणि पत्त्याचा पुराव्यांच्यासोबत ताब्यातील मालमत्तेच्या आरक्षित किंमतीच्या 10% परतावायोग्य अनामत रक्कम ठेव भरल्याचा तपशील सादर करावा लागेल.
4. या जाहीर ई-लिलावत यशस्वी न झालेल्या सर्व अन्य बोली लावणाऱ्यांचे ईएमडी LTHF द्वारे सदर जाहीर ई-लिलावच्या समाप्तीनंतर 7 दिवसांच्या आत परत केले जाईल. या ईएमडी वर कोणतेही व्याज दिले जाणार नाही.
5. यशस्वी खरेदीदार/बोलीदाराने, त्याच्या/तिच्या प्रस्तावापैकी 25% रक्कम (बयाणा रकमेसह) मुंबई येथे देय होणाऱ्या डी.डी./पी.ओ.च्या स्वरूपात एल&टी फायनान्स लिमिटेड च्या नावे लिलावाच्या तारखेला म्हणजे **25/06/2024** रोजी 18:00 पर्यंत किंवा आधी अथवा कामकाजाच्या पुढील दिवशी म्हणजे **26/06/2024** भरावी, ह्या जमा रकमेची खात्री एल&टी फायनान्स लिमिटेडकडून दिली जाईल, जर तसं झालं नाही तर विक्री पूर्ण झाली नाही असे मानले जाईल आणि सदर बोलीदाराची बयाणा रक्कम जप्त केली जाईल. शिल्लक रक्कम म्हणजे खरेदी किंमतीच्या 75% रक्कम खरेदीदाराकडून एल&टी फायनान्स लिमिटेडला अचल मालमत्तेच्या विक्रीच्या खात्रीनंतर पंधराव्या दिवशी किंवा त्याआधी अथवा कायद्यातील तरतुदींनुतार अशा विस्तारित कालावधीत दिली जाईल.
6. मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहितीसाठी, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना संपर्क करावा म्हणजे मालमत्तेचे निरिक्षण किंवा आणखी माहिती, संभाव्य बोलीदारांनी अधिकृत अधिकाऱ्यांना म्हणजे **''नाव - अशोक लब्दे, संपर्क क्रमांक 9637764444, ऑफिस: एल&टी फायनान्स लि. - ऑफिस क्रमांक 301, तिसरा मजला, जेनिथ कॉम्प्लेक्स, साकार संकुल जवळ, शिवाजी नगर, पुणे - 411005, आणि संतोष तिवारी, संपर्क क्रमांक 9920490126, एल&टी फायनान्स लि. - ऑफिस: 6वा मजला, बृंदावन बिल्डिंग, प्लॉट नं. 177, कलिना, सीएसटी रोड, मर्सिडीस शोरुमजवळ, सांताक्रूझ (पूर्व), मुंबई - 400 098.''** या पत्त्यावर संपर्क साधावा. ई-लिलावाच्या कोणत्याही टप्प्यावर, अधिकृत अधिकारी बोली/प्रस्ताव स्विकारू/नाकारू/बदल/रद्द करु शकतात किंवा कोणतेही कारण न देता आणि पूर्वसूचना न देता ई-लिलावपुढे नेऊ शकतात.
7. यशस्वी खरेदीदार/बोली लावणार हे लागू कायद्यानुसार सदर मालमत्ता त्याच्या/तिच्या/त्यांच्या नावे कन्वेड/डिलिवर्ड करुन घेण्यासाठी भरणे आवश्यक असलेले कोणतेही वैधानिक थकबाकी. कर, शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क इ. यांचे वहन करतील.
8. कर्जदार/हमीदार, जे सदर थकबाकीकरिता उत्तरदायी आहेत, ते सदर विक्री नोटीस ही अनामत व्याज (सक्तवसुली) अधिनियमांच्या नियम 8 (6) खाली वर उल्लेखित जाहीर ई-लिलाव विक्रीच्या आयोजनाबाबत एक नोटीस म्हणून समजतील.
9. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक) ह्यांना इथे कळवण्यात येत आहे की सदर जाहीर ई-लिलावाच्या तारखेआधी वर दिलेली संपूर्ण थकबाकी भरावी, अन्यथा सरफेसी कायदा, 2002 मधील तरतुदींनुसार एल&टी फायनान्स लि. सदर मालमत्ता विकेल.
10. कर्जदार (एक/अनेक)/सह-कर्जदार (एक/अनेक)/गॅरेंटर (एक/अनेक)/मॉर्टगेजर (एक/अनेक)/सामान्य जनता ह्यांना प्रतिबंध करण्यात येत आहे की एल&टी फायनान्स लिमिटेडची पूर्व लेखी संमती मिळाल्याशिवाय सूचनेतील सिक्युअर्ड मालमत्ता विक्री, लीज किंवा इतर प्रकारे हस्तांतरीत करू नये.

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी
करिता एल&टी फायनान्स लिमिटेड

दिनांक: 07.06.2024
ठिकाण: नाशिक

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, **मुख्य संपादक** अशोक विठ्ठल सोनवणे यांनी शितल प्रिंटर्स, प्लॉट नं. ६०, भूषण नगर, केडगाव देवी, अहमदनगर ४१४००१ (महाराष्ट्र) येथून छापून शॉप नं. २, तिसरा मजला, बळवंत प्लाझा, वकील वाडी, हॉटेल पंचवटीच्यासमोर, नाशिक - १, पिन - ४२२००१ येथे प्रकाशित केले. ✻ **व्यवस्थापकीय संपादक** - रंजन साळवी. फोन नं. (०२५३) २३१०६०० RNI : MAHMAR/2011/41224. EMAIL : lokmanthan.nashik2498@gmail.com (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील.)